# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १२२७/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्रीमती पद्मा प्रभुनाथ कोल्हे, ओम अपार्टमेंट, प्लॉट नं.३७, मालविय नगर, खामला रोड, नागपूर-४४००२५. | कर निरीक्षक, नगर परिषद, वर्धा ता.जि. वर्धा | मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा ता.जि. वर्धा |

**सुनावणी दिनांक :- १३.११.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०५.०५.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती पुरविली नसल्याने,

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती नाही

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २४.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २४.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : --

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : दिनांक २९.११.२०१९ ला नळ जोडणी बंद करण्यात आली त्यानुसार सन २०१६-१७ ते २०१९-२० या वर्षाचे मकान करात पाणी कर दर्शविला नाही. परंतु अचानक सन २०२०-२१ ते २०२१-२२ या वर्षाचे बीलात पाणी कर लागु करण्यात आला. त्यामुळे अर्जदाराला मकान कराचे बीलातुन पाणी कर कायमचा कमी झाल्याबाबत अर्जदाराला लेखी कळविण्याबाबत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद / उत्तर दिलेले आढळून येत नाही.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती पुरविली नसल्यामुळे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०८.०२.२०२२रोजी झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा कर विभाग, नगर परिषद वर्धा यांनी अपीलार्थी यांचे विशेष पाणी कर कायमस्वरुपी मालमत्ता करातून कमी करण्यात यावा करीता अपीलार्थी यांनी दाखल केलेली अपील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्यांना डिमांड पावती काढुन देण्यात यावी, असा आदेश पारीत करण्यात आला.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —** अपीलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नसून प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. राजेश भगत उपस्थित आहेत. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त झालेला आहे.

**६. निष्कर्ष —** सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) आज सुनावणी दरम्यान प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलात नमूद केल्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती दिली आहे असे सांगितले. अपीलार्थीस माहिती लेखी स्वरुपात online portal प्रिंट काढून दिली आहे. तथापि, प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपीलार्थीस पुनश्च डिमांड पावती प्रमाणित करुन देण्यात यावी.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक यांनी प्रथम अपील आदेशानुसार अपीलार्थीस पुनश्च डिमांड पावती प्रमाणित करुन देण्यात यावी.

२) वरील निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.११.२०२४**

जावक क्रमांक 179 दिनांक 10 JAN 2025